# महाराष्ट्र शासन
## भूमि अभिलेख विभाग

गट-क संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात २०२१

शासन मान्यता पत्र क्रमांक : राभूअ २०१९/प्र.क्र.५५/ई-६ दिनांक २०/०७/२०२१.

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक) संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी  विहीत अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांकडून स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा विभागाच्या https://landrecordsrecruitment2021.in व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९/१२/२०२१ ते ३१/१२/२०२१ पर्यंत उपलब्ध राहील.

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन भरण्याचा कालावधी | दिनांक ०९/१२/२०२१ सकाळी ११.०० ते दिनांक ३१/१२/२०२१ रात्री २३.५९ पर्यंत |
| २ | ऑनलाईन शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक ०९/१२/२०२१ ते दिनांक ०१/०१/२०२२ रात्री २३.५९ पर्यंत |
| ३ | परीक्षेचा प्रस्तावित दिनांक | रविवार दिनांक २३/०१/२०२२ *** |

***** आवश्यकतेनुसार परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.**

भरती प्रक्रिये संदर्भातील सर्व कार्यक्रम व सूचना विभागाच्या वरील संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. भरती प्रक्रिये संदर्भातील निर्णयाचे सर्व अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

१. भरावयाच्या पदांचा तपशील
पदाचे नाव व वेतनश्रेणी - भूकरमापक तथा लिपीक,
वेतन स्तर एस-६ (रु. १९९०० - रु. ६३२००)

(i) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंप ग्रस्त | महिला | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | समांतर आरक्षण विरहीत | |
| १ | अनु. जाती | २ | १ | ० | ३ | १ | १ | ० | २ | १० |
| | अनु.जमाती | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | ३ | ७ |
| | वि.जा.अ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | २ | ४ |
| | भ.ज. ब | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | २ |
| | भ.ज. क | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | ४ | ८ |
| | भ.ज. ड | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | १ | ५ |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | २ |
| | इ.मा.व. | ८ | ३ | १ | १६ | ३ | ५ | ० | १६ | ५२ |
| | ईडब्ल्यूएस | २ | १ | ० | ५ | १ | २ | ० | ५ | १६ |
| | अराखीव | ९ | ३ | १ | १७ | ३ | ६ | १ | १७ | ५७ |
| | **एकूण** | २५ | ८ | २ | ५० | ८ | १७ | १ | ५२ | १६३ |
| | दिव्यांगाकरीता राखीव - **एकुण-१२** (अल्पदृष्टी-२, श्रवणदोष-३, अस्थीव्यंग-१, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-६) | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

(ii) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख,  कोकण प्रदेश, मुंबई

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | समांतर आरक्षण विरहीत | |
| २ | अनु. जाती | ७ | २ | १ | १४ | २ | ५ | ० | १६ | ४७ |
| | अनु.जमाती | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | ४ | ८ |
| | वि.जा.अ | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | ३ | ७ |
| | भ.ज. ब | २ | १ | ० | ३ | १ | १ | ० | २ | १० |
| | भ.ज. क | २ | १ | ० | ५ | १ | २ | ० | ५ | १६ |
| | भ.ज. ड | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | १ | ५ |
| | वि.मा.प्र. | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | ३ | ७ |
| | इ.मा.व. | ८ | ३ | १ | १६ | ३ | ५ | १ | १५ | ५२ |
| | ईडब्ल्यूएस | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ० | ७ | २५ |
| | अराखीव | १० | ३ | १ | २० | ३ | ७ | १ | २२ | ६७ |
| | **एकूण** | **३७** | **११** | **४** | **७४** | **११** | **२७** | **२** | **७८** | **२४४** |
| | दिव्यांगाकरीता राखीव -**एकुण १०** (अल्पदृष्टी-३, श्रवणदोष-३, अस्थीव्यंग-२,स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-२) | | | | | | | | | |

(iii) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख,  नाशिक प्रदेश, नाशिक

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | समांतर आरक्षण विरहीत | |
| ३ | अनु. जाती | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | १ | ५ |
| | अनु.जमाती | २ | १ | ० | ५ | १ | २ | ० | ५ | १६ |
| | वि.जा.अ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| | भ.ज. ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज. क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | भ.ज. ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ | ३ |
| | इ.मा.व. | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ० | ७ | २५ |
| | ईडब्ल्यूएस | २ | १ | ० | ३ | १ | १ | ० | ३ | ११ |
| | अराखीव | ६ | २ | १ | ११ | २ | ४ | ० | ११ | ३७ |
| | **एकूण** | १५ | ५ | २ | ३० | ६ | ११ | ० | ३३ | १०२ |
| | दिव्यांगाकरीता राखीव -**एकुण ४** (अल्पदृष्टी-१, श्रवणदोष-१, अस्थीव्यंग-१,स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-१) | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

(iv) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | समांतर आरक्षण विरहीत | |
| ४ | अनु. जाती | २ | १ | ० | ५ | १ | २ | ० | ४ | १५ |
| | अनु.जमाती | ३ | १ | ० | ५ | १ | २ | ० | ५ | १७ |
| | वि.जा.अ | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | २ | ६ |
| | भ.ज. ब | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | २ | ६ |
| | भ.ज. क | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | १ | ५ |
| | भ.ज. ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | इ.मा.व. | ७ | २ | १ | १४ | २ | ५ | ० | १४ | ४५ |
| | ईडब्ल्यूएस | ३ | १ | ० | ६ | १ | २ | ० | ८ | २१ |
| | अराखीव | १४ | ५ | २ | २७ | ५ | ९ | १ | २८ | ९१ |
| | **एकूण** | **३२** | **१०** | **३** | **६४** | **१०** | **२३** | **१** | **६४** | **२०७** |
| | दिव्यांगाकरीता राखीव - **एकुण ८** (अल्पदृष्टी-३, श्रवणदोष-०, अस्थीव्यंग-२, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-३) | | | | | | | | | |

(v) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश, अमरावती

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | समांतर आरक्षण विरहीत | |
| ५ | अनु. जाती | २ | १ | ० | ४ | १ | १ | ० | ४ | १३ |
| | अनु.जमाती | ३ | १ | ० | ६ | १ | २ | ० | ७ | २० |
| | वि.जा.अ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | २ |
| | भ.ज. ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | भ.ज. क | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | २ |
| | भ.ज. ड | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ३ |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | २ |
| | इ.मा.व. | ५ | १ | १ | ९ | १ | ३ | ० | १० | ३० |
| | ईडब्ल्यूएस | २ | १ | ० | ३ | ० | १ | ० | ४ | ११ |
| | अराखीव | ३ | १ | ० | ६ | १ | २ | ० | ११ | २४ |
| | **एकूण** | **१६** | **५** | **१** | **३२** | **४** | **९** | **०** | **४१** | **१०८** |
| | दिव्यांगाकरीता राखीव -**एकुण** ०४ (अल्पदृष्टी-०, श्रवणदोष-०, अस्थीव्यंग-१,स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-३) | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

(vi) विभाग – उपसंचालक भूमि अभिलेख,  नागपुर प्रदेश, नागपुर

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | समांतर आरक्षण विरहीत | |
| ६ | अनु. जाती | ३ | १ | ० | ७ | १ | २ | ० | ९ | २३ |
| | अनु.जमाती | ३ | १ | ० | ६ | १ | २ | ० | ७ | २० |
| | वि.जा.अ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | भ.ज. ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज. क | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | २ |
| | भ.ज. ड | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | वि.मा.प्र. | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | २ | ४ |
| | इ.मा.व. | ३ | १ | ० | ७ | १ | २ | ० | ८ | २२ |
| | ईडब्ल्यूएस | ३ | १ | ० | ६ | १ | २ | ० | ६ | १९ |
| | अराखीव | १५ | ५ | २ | २९ | ५ | १० | १ | ३० | ९७ |
| | **एकूण** | २८ | ९ | २ | ६० | ९ | १८ | १ | ६२ | १८९ |
| | दिव्यांगाकरीता राखीव -**एकुण**-८ (अल्पदृष्टी-१, श्रवणदोष-१, अस्थीव्यंग-१, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-५) | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

२. वयोमर्यादा व विहित शैक्षणिक अर्हता:

उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास (दिनांक ३१/१२/२०२१) रोजी धारण केलेली असावी.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | अर्हता / अनुभव | किमान व कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | भूकरमापक तथा लिपीक | १) मान्यता प्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील किंवा मान्यता प्राप्त संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केल्यावर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे दोन वर्षांचे सर्वेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र.**<br>२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. गतीचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र.<br>उपरोक्त क्र. (२) मध्ये नमुद टंकलेखन विषयक अर्हता पूर्ण करत नसलेली व्यक्ती सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र ठरेल. परंतु, अशा व्यक्तीने सदर अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर अर्हता धारण न केल्यास तो/ती सेवा समाप्तीस पात्र राहील. | १८ ते ३८ |

**** केंद्र शासनाच्या मा. महासंचालक, रोजगार व प्रशिक्षण क्र. DGE&T-१९/०६(१)/२०१४-CD, दिनांक ०४ जुलै २०१४ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकवला जाणाऱ्या सर्व्हेअर अभ्यासक्रमाचा कालावधी प्रवेश सत्र ऑगस्ट २०१४ पासून एक वर्ष कालावधीचा झालेला आहे. त्यानुसार अभ्यासक्रम पुर्ण करुन त्याबाबतचे वैध प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार वरील पदाकरीता अर्ज करण्यास तसेच परिक्षेस बसण्यास पात्र असतील, मात्र त्याबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या पुढील आदेशानुसार त्यांचे निवडीबाबत कार्यवाही करण्यात येईल व त्याबाबत शासनाकडील निर्णय अंतिम राहील.**

| अ.क्र. | खालील उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादेत शिथीलता राहील | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात मोडणारे उमेदवारा यांचेसाठी | कमाल वयोमर्यादेच्या ५ वर्ष अधिक |
| २ | प्रकल्पग्रस्त यांचेसाठी | ४५ वर्षांपर्यंत |
| ३ | दिव्यांग असणाऱ्या (Person with Disability) उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षांपर्यंत |
| ४ | अ) माजी सैनिक यांचेसाठी | विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष इतका राहील |
| | आ) दिव्यांग असणाऱ्या (Person with Disability) माजी सैनिक यांचेसाठी | ४५ वर्षांपर्यंत |
| ५ | अंशकालीन उमेदवार यांचेसाठी | ४६ वर्षांपर्यंत |
| ६ | खेळाडू उमेदवार यांचेसाठी | ५ वर्ष पर्यंतची अट शिथील. जास्तीत जास्त ४३ वर्षापर्यंत |
| ७ | भूकंपग्रस्त उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षापर्यंत |
| ८ | स्वातंत्र संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, १९९१ चे जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षांपर्यंत |

परीक्षेचे स्वरुप :-

| पदनाम | परीक्षेचे स्वरुप व गुण | परीक्षेचा दर्जा |
|---|---|---|
| भूकरमापक तथा लिपीक | १०० प्रश्न (मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी प्रत्येकी ५० गुण) याप्रमाणे एकूण २०० गुण | माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जा समान |

## ४. परीक्षा शुल्क

अमागास प्रवर्ग : रु. ३००/-

मागास प्रवर्ग : रु. १५०/-

टिप : अ) वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क हे बॅक प्रोसेसिंग शुल्क (लागू असेल तर) वगळून आहे. तसेच परीक्षा शुल्काची रक्कम ही ना परतावा असेल.

ब) माजी सैनिकांना परीक्षा शुल्क लागू नाही.

## ५. निवडीचे निकष :

गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने ऑफलाईन लेखी परीक्षेत एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

पदासाठी विहित केलेल्या अर्हता/ अटी/ शर्ती पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांची सदर परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांकडून विहित आरक्षणानुसार निवड यादी बनविण्यात येईल.

एकाच पदासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास दि. ०२/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल :-

१) समान गुण असल्यास आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

२) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. १ नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

३) वरील अनु क्र. १ व २ या दोन्ही अटीमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे ) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४) वरील अनु.क्र. १, २ व ३ या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतम गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

## ६. वरील पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांकरीता सूचना :

१) उपरोक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज https://landrecordsrecruitment2021.in व https://mahabhumi.gov.in संकेतस्थळावर दि. ०९/१२/२०२१ पासून ते दि.३१/१२/२०२१ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

२) विहीत पध्दतीने मुदतीत म्हणजेच दिनांक ३१/१२/२०२१ पुर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दि. ०१/०१/२०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

३) स्पर्धात्मक परीक्षा स्थगित व रद्द करणे, परीक्षेचे स्वरुप, तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या, अनुशेष व आरक्षण यात वाढ किंवा घट करण्याचे अधिकार विभागास राहतील व विभागाचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास सामाजिक आरक्षणाच्या त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वा तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

४) ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांना देखील परीक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईनच सादर करणे आवश्यक आहे.

५) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा, शिथीलीकरण इत्यादी पात्रता तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावा.

६) उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. उमेदवारांना ऑफलाईन (OMR) आधारीत परीक्षेतील मिळालेल्या गुणांच्या आधारे तसेच त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे सर्व अधिकार भूमि अभिलेख विभाग राखून ठेवीत आहे.

७) परीक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात मोबाईल, गणकयंत्र (कॅल्क्युलेटर), आयपॅड तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने वापरण्यास सक्त मनाई आहे.

८) इतर राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्ग उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही.

९) उमेदवारास परीक्षा/कागदपत्र पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

१०) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची यादी परीक्षेकरीता संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.

११) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी आल्यास मदतकक्ष दूरध्वनी क्रमांक ७०५७०७०८४२, ७०५७०८०५७२ वर सोमवार ते शनिवार सकाळी ९.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत संपर्क साधावा, तसेच landrecordsrecruitment2021@gmail.com हा ई-मेल आयडी मार्गदर्शनासाठी उपलब्ध राहील.

१२) ऑफलाईन (OMR) परीक्षा मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती या ठिकाणी घेण्यात येणार आहे. तथापि आवश्यकतेनुसार परीक्षा स्थळामध्ये वाढ /बदल करण्याचे अधिकार

भूमि अभिलेख विभागाकडे राहतील. परीक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील.

१३) परीक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने पाठविले जाणार नाही.

१४) पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल वरील संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

**७. परीक्षेचे केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना :**

१) परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.

२) परीक्षेचे केंद्र स्थळ / दिनांक/वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

३) कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढविणे यांचे अधिकार भूमि अभिलेख विभाग राखून ठेवत आहे.

४) उमेदवाराने मागितलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार भूमि अभिलेख विभाग राखून ठेवीत आहे.

५) उमेदवार परीक्षा स्थळावर त्याच्या/तिच्या स्वत:च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यासाठी उमेदवारांस कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास भूमि अभिलेख विभाग जबाबदार राहणार नाही.

**सर्वसाधारण अटी :**

१) शासन निर्णय सा.प्र.वि. क्रमांक प्रशासन २०००/प्र.क्र.५/२००१/३२, दि. २०/०७/२००२ व दि. १९/०३/२००३ शासन निर्णयानुसार उपरोक्त पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.मातंसं २०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०४/०२/२०१३, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन पुरकपत्र दिनांक ०८/०१/२०१८ व दिनांक १६/०७/२०१८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संगणक हाताळणे/ वापराबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनाकांपासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

२) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारीरीक क्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र शासनाने माध्यमिक शालांत परीक्षेशी समकक्ष ठरवलेली परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांस महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाकडून/शासनाकडून अशा परीक्षेची समकक्षता पडताळणी करुन घेतल्यानंतरच नियुक्ती दिली जाईल.

५) निवड यादीतील उमेदवाराने नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, जात प्रमाणपत्र, सन २०२०-२१ (चालू वित्तीय वर्षाचे) साठी वैध असलेला नॉन क्रिमीलेअर दाखला (आवश्यक त्या प्रवर्गासाठी). तसेच समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्याचप्रमाणे इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती छाननीसाठी तपासणीसाठी नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रे कागदपत्रे यांची छाननी नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. व तद्नंतरच नियुक्तीस पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती वरील प्रमाणपत्रे (कागदपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास /माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/ नियुक्ती रद्द होईल.

६) सदर पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस १ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी लागू राहील. (परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत वाढविता येईल). या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस परिविक्षाधीन कालावधीत, विहीत केलेले भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद येथील प्रशिक्षण पूर्ण करणे, या पदासाठी विहीत सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर त्याने/तिने विहीत प्रशिक्षण पूर्ण केले नाही अथवा सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण केली नाही अथवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकाररित्या पूर्ण केला नाही अथवा त्या पदावर काम करण्यास योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो/ती सेवा समाप्तीस पात्र राहील.

७) शासन निर्णय क्र. पंअक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६अ, दि. २७/१०/२००९ नुसार अंशकालीन उमदेवार म्हणजे सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेले पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार.

८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-१-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक क्र.राक्रीधो-१-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुरो-२, दिनांक १०.१०.२०१७, तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.११ मार्च,२०१९, आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीचे आरक्षण तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच वरील नमूद शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधीत विभागाचे विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने अर्जासोबतच विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील. तसेच एकापेक्षा जास्त खेळाची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्र प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

- शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र. ८२/२००१/म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि. २५.०५.२००१ मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता इतर सर्व मागासप्रवर्ग तसेच खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष २०२०-२१ या कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात ३१/०३/२०२१ पर्यंत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Non-creamy layer Certificate) तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
- शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. संकीर्ण -२०१७/प्र.क्र. १९१/१७/कार्या-२, दि. १५.१२.२०१७ नुसार नमूद सुधारणा नुसार जाहिरातीमध्ये अर्ज करावयाच्या अंतिम दिनांकापासून उमेदवाराचे मागील तीन आर्थिक वर्षाचे सरासरी उत्पन्न नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रासाठी ग्राहय धरले जाईल. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Non-creamy layer Certificate) तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

- दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण :-

  - दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दि. २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

    महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आस्था-२०२०/प्र.क्र.१५८/ई-६, दि. २९/०६/२०२१ अन्वये पुढील तक्त्यातील संवर्गासमोर नमूद केलेले दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती /उमेदवार सदर पदाकरीता आरक्षणांतर्गत पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदाकरीता निश्चित करण्यात आलेला दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | भूकरमापक तथा लिपीक | a. LV<br>b. HH<br>c. OA, OL, LC, Dw, AAV<br>d. ASD(M), SLD, MI<br>e. MD involving (a) to (d) above |

**ABBREVIATIONS USED :-** LV=Low Vision, HH=Hearing Handicapped, OA=One Arm, OL=One Leg, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims, ASD(M)=Autism Spectrum Disorder(Mild), SLD=Special Learning Disorder, MI= Mental Illness, MD=Multiple Disabilities.

दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींकरीता (Person with disability) आरक्षित असलेल्या पदांवरील नियुक्तीसाठी संबधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्हाच्या शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकिय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या नि:समर्थ असणाऱ्या उमेदवारांस (Person with disability) संबंधित वैद्यकिय मंडळाने त्या पदाचे कर्तव्य बजावण्यास शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्यानंतरच प्रत्यक्ष नेमणूकी देण्यात येतील.

- अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. भुकंपग्रस्त/ प्रकल्पग्रस्त उमेदवारांकडे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. छाननीच्या वेळी उमेदवाराने सदर नोंदणीपत्र/ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

- महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधि. क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) तथा वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), आणि भ.ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी, ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे वर्ष २०२०-२१ करीता वैध असलेले (दि.३१.०३.२०२१ पर्यंत वैध) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- **खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस.)-** खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस.) वर्गातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.राआधी-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२/०२/२०१९ अन्वये विहित करण्यात आलेले कागदपत्रे/पुरावा (परिशिष्ट-क) आणि स्वयंघोषणापत्र (परिशिष्ट-ड) पडताळणीच्यावेळी आवश्यक राहील. तसेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या /उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि. १३/१०/१९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक राहील.

  सदर प्रवर्गातील उमेदवारांकरीता वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती ह्या इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

  **विहित वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचा अर्ज त्यांचे विभागातील सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावा. सदर पदाकरीता अर्ज भरण्यासाठी तसेच परीक्षेस बसण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याच्या पुर्व परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करणे आवश्यक राहील.**
- सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परीपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, ०१ जुलै २००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये विहित केल्यानुसार शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना "अ" आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे. सदर प्रतिज्ञापन कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापनाचा नमुना परिशिष्ट "अ" प्रमाणे आहे.
- ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविली असल्याचे आढळल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच

नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

- ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर होईल अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश देण्यात येतील. सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

  मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
- सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.
- अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह ) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंबधातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.
- अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना त्यांनी अर्ज सादर करताना निवडलेल्या भूमि अभिलेख विभागाच्या अधिपत्याखालील मुंबई (कोकण)/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर या विभागात नियुक्ती देण्यात येईल.
- अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व कागदपत्रे योग्य असल्याची व शासन निर्णयाच्या अटींची पूर्तता होत असल्याची खात्री झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.
- निवड सूचीमधून उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस झाल्यानंतर शिफारस झालेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवड सूचीतील प्रतिक्षा यादीवरील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची निवड करण्यात येईल.
- वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड) या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.
- तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनाकांपर्यंत या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य असेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. तथापि सदर विधीग्राह्य कालावधी मध्ये बदल करण्याचा अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडे राहतील.
- काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या https://landrecordsrecruitment2021.in व https://mahabhumi.gov.in

या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

- मध्यस्थ/ ठग/ भूमि अभिलेख विभागाशी संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या सूचना उमेदवारांस देण्यात येत आहेत.
- कोणत्याही कारणास्तव सदर जाहिरातीत दर्शविण्यात आलेली पदे अथवा सदरहू जाहिरात रद्द करण्याचा अधिकार भूमि अभिलेख विभाग राखून ठेवत आहे. सदर भरतीच्या नियम/ निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन निर्णय/ परिपत्रक/ विभागाच्या निर्णयानुसार बदल होऊ शकतो. कोणताही किंवा सर्व अर्ज त्यासाठी काहीही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार भूमि अभिलेख विभाग राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन)
नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना "अ"
प्रतिज्ञापत्र
**नमुना अ**

मी, श्री /श्रीमती/कुमारी ______________________________ श्री___________________________ यांचा/यांची मुलगा / मुलगी/ पत्नी वय______वर्ष _________राहणार_______________________ याव्दारे पुढीलप्रमाणे जाहिर करतो/करते की, मी ______________________ या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

आज रोजी मला ______(संख्या) इतकी हयात मुले / मुली आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ यानंतर मला झालेल्या मुलांची संख्या ______ आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा).

हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:
दिनांक:

(अर्जदाराची सही)

- **ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत --**

  १) उपरोक्त पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा दि. ०९/१२/२०२१ ते ३१/१२/२०२१ पर्यंत https://landrecordsrecruitment2021.in व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

  २) विहित पध्दतीने माहिती सादर करुन दिनांक ३१/१२/२०२१ अखेर अर्ज सादर केलेल्या उमेदवारांसाठी शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दि.०१/०१/२०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

  ३) उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा /अपुर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविलेल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना भूमि अभिलेख विभाग जबाबदार राहणार नाही. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस.द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थतीत इतर व्यक्तीसोबत देवाण-घेवाण करु नये. एखादया उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ईमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

  ४) ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर मिळणाऱ्या ई पावतीची (Transaction Successful झाल्यानंतर) प्रत त्वरीत मुद्रण करुन (Printout) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

  ५) ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरीता "Click for Registration" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी नमूद करावा. तद्नंतर "Submit" बटन दाबावे. त्यानंतर उमेदवाराच्या भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी वर OTP येईल. सदर OTP टाकल्यानंतर Log-in Id व Password भ्रमणध्वनी व email id द्वारे प्राप्त होईल.

तद्नंतर सदर Log-in Id व Password वापरून उमेदवाराला अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरू करता येईल.

६) उमेदवाराने स्वत:चे/ वडीलांचे/ पतीचे नांव तसेच नावाचे स्पेलिंग योग्यरित्या भरणे आवश्यक आहे.

**७) अर्जदार यांनी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व विभागीय उपसंचालक भूमि अभिलेख यांच्या विभागातील प्रवर्गनिहाय रिक्त जागांचे व्यवस्थित अवलोकन करुन अर्जामध्ये ज्या विभागाकरीता अर्ज सादर करायचा आहे तो विभाग काळजीपुर्वक निवडावा.**

८) ऑनलाईन अर्ज भरून झाल्यानंतर "Save & Preview" टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा. जर अर्जामध्ये काही सुधारणा करावयाची असेल तर Edit या बटनाचा वापर करून माहितीमध्ये आवश्यक सुधारणा करावी.

९) आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच अलीकडच्या काळातील छायाचित्र (फोटो) व स्वाक्षरी योग्य रितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन "Payment/make payment" बटनवर क्लिक करून परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.

१०) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रितीने भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्दतीने भरल्यानंतर अर्ज स्वीकृत होईल. एकदा शुल्क भरणा केल्यानंतर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने आवश्यक ती माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

११) Registration केल्यानंतर तयार होणारा login id व password उमेदवारांनी जतन करणे आवश्यक आहे.

१२) ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही भूमि अभिलेख विभागाने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. तद्नंतर केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१३) उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही.

१४) उमेदवाराने अर्जात स्वत:चे नांव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी व **ज्या विभागाकरीता अर्ज**

**करावयाचा आहे तो विभाग** इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास भूमि अभिलेख विभाग जबाबदार राहणार नाही.

१४) अपूर्ण अर्ज उदा. छायाचित्र आणि स्वाक्षरी इत्यादी नसलेले अवैध ठरविण्यात येईल.

१५) वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुसऱ्या पध्दतीने केलेले अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

१६) उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी.

१७) उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

१८) रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने संपूर्ण अर्जाची प्रत Download करून त्याची मुद्रण प्रत (Printout) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वत: जबाबदार राहील त्यास भूमि अभिलेख विभाग कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

- **ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत –**

१) ऑनलाइन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित करुन उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

२) परीक्षा शुल्क इंटरनेट बँकींग किंवा क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्ड किंवा युपीआय इ. व्दारे भरता येईल.

३) ऑनलाईन परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर थोडा वेळ वाट पहाणे आवश्यक आहे. सदर कालावधीत कोणत्याही परिस्थितीत refresh / back किंवा अन्य बटन/key दाबू नये.

४) ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-Receipt) तयार होईल. ई-पावती तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते.

५) उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास अशावेळी उमेदवाराने ऑनलाईन लिंकवर जाऊन पुन:श्च लॉग इन करणे आवश्यक आहे.

६) नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती मिळेल. सदर ई-पावती व ऑनलाईन अर्जाची प्रत Download करून त्याची मुद्रण प्रत (Printout) ठेवणे आवश्यक आहे.

७) आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतर ब्राऊजर विंडो बंद करण्याची दक्षता घ्यावी.

८) उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

- छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याच्या सूचना.

छायाचित्र (फोटो) :-

१) उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र अपलोड करावे.
२) सदरचे छायाचित्र फिकट, रंगीत किंवा पांढऱ्या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.
३) कॅमेऱ्याकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे, सुर्यप्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. फ्लॅशचा वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.
४) चष्मा वापरत असल्यास तुमचे डोळे दिसतील अशा प्रकारचे छायाचित्र असावे. छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये. जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
५) स्कॅन केलेले छायाचित्र हे १००kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरी :-

१) उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढऱ्या कागदावर स्वाक्षरी करावी.
२) सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराचीच असावी. सदरची स्वाक्षरी ही प्रवेशपत्रावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी.
३) अर्जासोबत अपलोड केलेले स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
४) स्वाक्षरीची स्कॅन केलेली ईमेज ही ५०kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी.

- छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची पध्दत .

१) छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी अर्जामध्ये दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उमेदवाराने योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र स्वाक्षरी असेलेली फाईल Select करावी व Upload बटनावर क्लिक करावे.
२) उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पध्दत अवलंबिल्याशिवाय Upload होणार नाही याची नोंद घ्यावी.
३) उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

- **प्रवेशपत्र डाऊनलोड करणे**

  प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस. व्दारे कळविण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवारांनी भूमि अभिलेख विभागाच्या संकेतस्थळावर भेट द्यावी. संकेतस्थळावरील भरतीविषयक संबधित Link वर Click केल्यानंतर अर्जदारास Login करावे लागेल. Login केल्यावर अर्जदारास "HallTicket" बटनावर Click करून प्रवेशपत्र डाऊनलोड करावे. उमेदवाराने प्रवेशपत्रावर रजिस्ट्रेशन करताना वापरलेले अलिकडच्या काळातील छायाचित्र चिकटवावे.

- **ओळख पटवणे**

  १) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड/ पारपत्र/ वाहनचालक परवाना/ मतदार ओळखपत्र/ फोटोसहित आधारकार्ड/ बँकेचे फोटोसहीतचे पासबुक/ महाविद्यालयाचे/ विद्यापीठाचे अलिकडील वैध ओळखपत्र/ कर्मचारी ओळखपत्र/ फोटोसहित असणारे बार कौन्सिलेचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख ही उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक/ उपस्थितीपत्रक त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

  टिप : उपरोक्त परीक्षेला उपस्थित रहातांना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची उपरोक्त नमूदपैकी आवश्यक तो मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती, परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या /मधल्या शेवटच्या नावांत विवाहानंतर बदल झाला असल्यास त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/ विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र (Affidavit) यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. **रेशनकार्ड व ई-आधार कार्ड परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.**

  सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑफलाईन परीक्षेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

  १) परीक्षेसाठी वैध प्रवेशपत्र

  २) मुळ फोटो ओळखपत्र

  ३) फोटो ओळखपत्राची छायाप्रत.